ePaper

## जेट एअरवेज प्रकरणात ईडीकडून 538 कोटीच्या मालमत्तेवर टाच!



| वर्ष - 7 । अंक - 175 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 2 नोव्हेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत

- डी कॉक, ड्युसेनने धुतले!
- 'छडी लागे छम छम' नव्या अंदाजात
- रोख्यांमुळे लोकशाहीला धोका!
- सरकारची प्रतिकात्मक अंत्ययात्रा!

# आमदार, खासदारांना 'अल्टिमेटम'!

## » मराठा आरक्षण: 24 तासांत भूमिका स्पष्ट करा!



। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या अनेक दिवसांपासून मराठा समाज मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र भर आंदोलने करत आहे. पिंपरी चिंचवड शहरात अनेक ठिकाणी मराठा समाज साखळी उपोषणासह विविध आंदोलने करत आहे. परंतु, पिंपरी-चिंचवडमधील आमदार, खासदार यांनी अद्याप आपली भूमिका स्पष्ट केलेली नाही. याबाबत मराठा क्रांती मोर्चाकडून संताप व्यक्त केला जात असून, २४ तासांत भूमिका जाहीर करा, अन्यथा आंदोलन करणार, असा इशारा देण्यात आला आहे.**

शहरातील खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेश लांडगे, आण्णा बनसोडे, अश्विनी जगताप व उमा खापरे यांनी मराठा आरक्षणाबाबत अद्याप भूमिका स्पष्ट केली नाही. या विषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पिंपरी येथे मराठा समाजातील कार्यकर्त्यांची बैठक झाली.

यावेळी आमदार खासदार यांचे विषयी प्रचंड नाराजी व्यक्त करण्यात आली. येत्या २४ तासांत आमदार, खासदार यांनी आपली भूमिका स्पष्ट करावी, असे न केल्यास झोपेत




असलेल्या आमदार, खासदार यांना जागे करण्यासाठी लवकरच शहरातील मराठा समाज तुमच्या भेटीला येईल, असा इशारा दिला आहे.

या बैठकीस सतिश काळे, प्रकाश जाधव, मारूती भापकर, धनाजी येळकर पाटील, नकुल भोईर, वैभव जाधव, मीरा कदम, सुनिता शिंदे, कल्पना गिडडे, नानासाहेब वारे यांच्यासह अनेक प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

### आज निषेध महामोर्चा...

»मराठा समाजास आरक्षण मिळावे या मागणीसाठी दोन महिन्यापूर्वी मनोज जरांगे पाटील यांनी आमरण उपोषण केले होते. उपोषणाच्या सतराव्या दिवशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे स्वतः उपोषण स्थळी गेले. मनोज जरांगे पाटलांना त्यांनी ३० दिवसांचा वेळ मागितला होता. जरांगे पाटलांनी त्यांना मराठा आरक्षण देण्याचे आश्वासन पूर्ण करण्यासाठी ४० दिवसांचा वेळ दिला. परंतु, महाराष्ट्र सरकार आरक्षण देवू शकले नाही. गेल्या आठ दिवसांपासून मनोज जरांगे पाटील हे झालेल्या फसवणुकीच्या निषेधार्थ व आरक्षण मागणी पूर्ण व्हावी. यासाठी आमरण उपोषण करत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पिंपरी येथे आठ दिवसांपासून साखळी उपोषण सुरू आहे. या निष्क्रीय अकार्यक्षम फसव्या सरकारचा निषेध करण्यासाठी पिंपरी-चिंचवड शहरातील मराठा क्रांती मोर्चा व सकल मराठा समाजाच्या वतीने गुरुवार दि. २ नोव्हेंबर रोजी निषेध मोर्चाचे आयोजन केले आहे. सदरचा मोर्चा सकाळी ११ वजता खंडोबा मंदीर चौक, आकुर्डी येथून तहसलिदार कार्यालय, निगडी असा निघणार आहे.

### पिंपळे गुरवमध्ये उपोषण...

**»मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील यांच्यावतीने सुरु असलेल्या लढ्याला आज पाठींबा देण्यासाठी पिंपळे गुरव येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सकल मराठा समाजाच्या वतीने एकदिवसीय साखळी उपोषणाचे आयोजन करण्यात आले होते. या उपोषणाला सर्व समाजातील नागरिकांनी पाठिंबा दर्शविला. भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष शंकर जगताप ग्रामस्थांसोबत एक दिवस लाक्षणिक साखळी उपोषणामध्ये सहभागी झाले.**

# पुण्यात सव्वाबारा हजार जणांना कुणबी प्रमाणपत्र

## » जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांची माहिती

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र मिळावे यासाठी राज्यभर वातावरण तापले असल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कुणबी प्रमाणपत्राचे वाटप करावे, असे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना जारी केले आहेत. त्या पार्श्वभूमीवर एक जानेवारी २०२२ ते ३१ ऑक्टोबरपर्यंत (मंगळवार) एकट्या पुणे जिल्ह्यात सुमारे सव्वाबारा हजार जणांना कुणबी प्रमाणपत्र देण्यात आले आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी दिली.**



मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी मनोज जरांगे -पाटील यांनी उपोषण सुरु केले आहे. त्यावरून राज्यात वातावरण चांगलेच तापले आहे. त्यांच्या उपोषणाला सकल समाजातून पाठिंबा मिळत आहे. गावोगावातून उपोषणाला नागरीक बसले आहेत. त्यावरून अनेक जिल्ह्यांतून कुणबी प्रमाणपत्र देण्याची मागणी वाढली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याचे आदेश जारी केले आहेत. महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीही या संदर्भात सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेतली. त्यांनीही असे आदेश दिले आहेत.

प्रमाणपत्र देताना १९६७ पूर्वीचे महसुली पुरावे तपासण्यात आले आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### आतापर्यंत तेरा हजार अर्ज

**» राज्यात कुणबी प्रमाणपत्र देण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले असले तरी पुणे जिल्ह्यात कुणबी प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही यापूर्वीच करण्यात आली होती. एक जानेवारी २०२२ ते ३१ ऑक्टोबर या काळात सुमारे १२ हजार ९११ एवढे अर्ज आले होते. महसुली पुरावे तपासून त्यातील १२ हजार २९४ जणांना आतापर्यंत कुणबी प्रमाणपत्र देण्यात आले आहेत. यातील ४६० अर्ज प्रलंबित असून अर्जदारांनी वंशावळ पुरावे सादर केल्यानंतर कार्यवाही करावी, असे आदेश संबंधित प्रांताधिकारी तसेच तहसिलदार यांना दिले आहेत, असे जिल्हाधिकारी देशमुख यांनी स्पष्ट केले.**

# पुणे विद्यापीठात हाणामारी!

## अभाविप-एसएफआयचे कार्यकर्ते एकमेकांशी भिडले

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात विद्यार्थ्यांच्या सदस्य नोंदणीहून अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) आणि स्टुडंट फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय) या दोन विद्यार्थी संघटनांच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार हाणामारी झाली. या घटनेनंतर दोन्ही संघटनांच्या कार्यकर्त्यांनी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप केले आहे. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन घटनास्थळी पोलिस दाखल झाले होते.**



दिल्लीतील 'जेएनयू'मध्ये विद्यार्थी संघटना एकमेकांना भिडण्याच्या घटना गेल्या काही वर्षांत घडल्या आहेत. तसाच प्रकार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात घडल्याचे दिसून आले. यापूर्वी, असाच संघर्ष २०१८ मध्ये पुणे विद्यापीठात झाला होता. एसएफआयची सदस्य नोंदणी सकाळी रिफेक्टरीजवळ सुरू होती. या वेळी परिषदेचे काही कार्यकर्तेही तेथे उपस्थित होते. सदस्य नोंदणीहून दोन्ही संघटनांच्या कार्यकर्त्यांमध्ये वाद झाला. या वादाचे रुपांतर जोरदार मारामारीत झाले. त्यात काही विद्यार्थ्यांना दुखापत झाली. या मारामारीमुळे विद्यापीठात काही काळासाठी तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या मारामारीबाबत विद्यापीठाच्या सुरक्षा विभागाने पोलिसांना माहिती दिल्यानंतर, तेथे पोलिस आले. पोलिसांकडून दोन्ही संघटनांच्या कार्यकर्त्यांची बाजू ऐकून घेण्यात आल्याची माहिती विद्यापीठातील सुरक्षा विभागाकडून देण्यात आली. दरम्यान, या प्रकाराची विद्यापीठाकडे कोणाही तक्रार केलेली नाही. पुणे विद्यापीठामध्ये एसएफआयची सभासद नोंदणी कार्यक्रम शांततेत सुरू असतांना अभाविपच्या कार्यकर्त्यांनी अचानक येऊन, एसएफआयच्या कार्यकर्त्यांवर हल्ला केला. या हल्ल्यात एसएफआयचे राज्य अध्यक्ष व केंद्रीय कमिटी सदस्य सोमनाथ निर्मळ, शहर सचिव अभिषेक शिंदे, गणेश जानकर यांना मार लागला आहे. इतरही कार्यकर्त्यांना सुद्धा मुका मार लागला आहे. घोळक्याने येऊन परवानगी घेतली का? असे प्रश्न विचारुन मारहाण केली. विद्यापीठाच्या सुरक्षा विभागाने देखील फक्त बघ्याची भूमिका घेतली व नंतर मध्यस्थी केली, अशी भूमिका एसएफआयच्या राज्य समितीने मांडली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये एसएफआय आणि इतर डाव्या विचारांच्या संघटनांची परवानगी शिवाय सदस्यता नोंदणी सुरू होती. पुणे विद्यापीठामध्ये रिफेक्टरी जवळच्या परिसरात शेकडो विद्यार्थी खिचडी खाण्यासाठी येतात. खिचडी खायला आलेल्या विद्यार्थ्यांना जबरदस्ती व दमदाटीने सदस्य करून घेण्यात येत होते. यावेळी काही विद्यार्थ्यांनी सदस्य होण्यासाठी नकार दिल्यावर, संबंधित संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सामान्य विद्यार्थ्यांना मारहाण करायला सुरुवात केली. या मारहाणीमध्ये काही जखमी झाले असून, एका विद्यार्थ्याच्या कपाळावर मोठी जखम झाली आहे.

> अभाविपची दादागिरी व गुंडगिरी वाढली असून, आजच्या घटनेत विद्यार्थ्यांना अमानुषपणे लाथा बुक्क्यांनी मारहाण करण्यात आली आहे. या घटनेचा आम्ही निषेध करतो. विद्यापीठातील विद्यार्थी किंवा इतर संघटनांसोबत आम्ही ताकतीने उभे आहोत, याची खात्री देतो. यापुढे अशा पद्धतीची गुंडगिरी सहन केली जाणार नाही, याचे भान अभाविपने ठेवावा.
>
> **- अक्षय जैन,** अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस (मीडिया विभाग)

# एसटीच्या निम्म्या गाड्या रद्द!

## मराठा आरक्षण आंदोलनाचा परिणाम

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा आरक्षण आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधून राज्यभरात जाणाऱ्या निम्म्या एसटी गाड्या बुधवारी रद्द करण्यात आल्या. पश्चिम महाराष्ट्रासह मराठवाडा, विदर्भ आणि खान्देशात जाणाऱ्या गाड्या रद्द करण्यात प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. गाड्या रद्द करण्यात आल्यामुळे एसटीला बुधवारी ३३ लाख २७ हजार रुपयांच्या उत्पन्नावर पाणी सोडावे लागले.**



> मराठा आरक्षण आंदोलन सुरू असलेल्या ठिकाणी तेथील स्थानिक पोलिसांच्या सूचनेनुसार एसटी गाड्या पाठविल्या जात नाहीत. पुणे विभागात राज्यभरात जाणाऱ्या निम्म्या गाड्या बुधवारी रद्द करण्यात आल्या.
>
> **-कैलास पाटील,** विभाग नियंत्रक

पुण्यातील स्वारगेट, शिवाजीनगर (वाकडेवाडी), पुणे स्टेशन आणि पिंपरी-चिंचवडमधील वल्लभनगर आगारातून राज्यभरात एसटी गाड्या सोडण्यात येतात. एसटीच्या पुणे विभागाकडून दररोज एक हजार २२९ गाड्या सोडल्या जातात. मराठा आरक्षण आंदोलन तीव्र झाल्यामुळे एसटीच्या अनेक गाड्या रद्द करण्याचा निर्णय प्रशासनाला घ्यावा लागला. एसटीच्या बुधवारी एकूण ६१४ गाड्या रद्द करण्यात आल्या. त्यामुळे ८४ हजार ९४१ किलोमीटरच्या फेऱ्या झाल्या नाहीत. त्यातून एसटीचे ३३ लाख स्वारगेट आगारातून प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणात गाड्या सोडल्या जातात. शिवाजीनगर (वाकडेवाडी) आगारातून मराठवाड्यात गाड्या सोडल्या जातात. मराठा आरक्षण आंदोलनामुळे कोल्हापूर, सांगली, सोलापूर, पंढरपूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, बीड, जालना, लातूर, नागपूर, अमरावती, अकोला आणि जळगाव यासह इतर ठिकाणी जाणाऱ्या गाड्या रद्द करण्यात आल्या. ऐन दिवाळीच्या तोंडावर एसटी गाड्या रद्द करण्यात आल्याने प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे.

# 'मराठा समाजाला तातडीने आरक्षण द्या'; दीपक मानकर यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

। पुणे । महाईन्यूज ।

मराठा समाजाच्या आंदोलनाची तीव्रता मोठ्या प्रमाणावर वाढत असून समाजाची भावना आणि गरज लक्षात घेता मराठा समाजाला तात्काळ आरक्षण देण्यात यावे, अशी मागणी पुणे शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष दीपक मानकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्राद्वारे केली आहे.



दीपक मानकर यांनी म्हटले आहे की, संपूर्ण महाराष्ट्रात आरक्षणासाठी मराठा समाजाच्या चालू असलेल्या लढ्याची व्याप्ती दूरवर पोहोचली आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखालील हा लढा अधिकच तीव्र होत चालला आहे. या लढ्याची व्याप्ती आणि आत्ताची सामाजिक परिस्थिती पाहता तसेच समाजाच्या भावना लक्षात घेता आरक्षणाचा निर्णय तातडीने घेणे गरजेचे आहे, असे वाटते, असे दीपक मानकर यांनी म्हटले आहे. त्यांनी पुढे म्हटले आहे की सकल मराठा समाजाला आरक्षण देण्यात यावे. त्यांच्या या लढ्यास राष्ट्रवादी काँग्रेसच्या पुणे शहर शाखेतर्फे पूर्ण पाठिंबा आहे.

राज्य शासनानेदेखील मराठा समाजास कोणत्याही कायदेशीर त्रुटी न ठेवता त्वरित आरक्षण देण्याचे सकारात्मक पाऊल उचलावे आणि समाजास न्याय मिळवून द्यावा, असे आवाहनही त्यांनी एकनाथ शिंदे यांना या पत्रात केले आहे.

# महापालिकेला दंड कोण करणार?

## मोशी, बोऱ्हाडेवाडी येथील स्थिती : प्रकल्पासाठी खोदलेला खड्डा डासोत्पत्तीचे कारण!

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मोशी-बोऱ्हाडेवाडी येथे सुरू असणाऱ्या पाण्याच्या टाकीजवळच पाण्योचे डबके तयार झाले आहे. त्या ठिकाणी डासोत्पत्ती होण्याची शक्यता असल्याचे परिसरातील नागरिक सांगत आहेत. त्यामुळे त्याला जबाबदार कोणाला धरणार ? दंड कोणाला आकारणार, असा संतप्त सवाल परिसरातील नागरिक उपस्थित करत आहेत.**



ऑन दी स्पॉट

मोशी, बोऱ्हाडेवाडी येथे पाण्याची टाकी उभारण्याचे काम सुरू आहे. काम झाल्यानंतर अनावश्यक सांडपाणी तिथल्या डबक्यात सोडले जात आहे. हे पाणी साचून दुर्गंधी येत आहे. तसेच डासांची निर्मिती होत आहे. त्या ठिकाणी कंटेनर सर्वे कोण करणार असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. त्यामुळे संबंधीत अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी देखील होत आहे.'

पिंपरी-चिंचवड शहरात सध्या व्हायरल फीव्हरची साथ पसरली आहे. महापालिका रुग्णालयात सर्दी, ताप आणि खोकल्यावर उपचार घेणाऱ्या रुग्णांची संख्या वाढत आहे. या बरोबरच आता डेंग्यू, चिकनगुनियाचे रुग्ण वाढत आहेत.

डबक्यात साचलेले पाणी, भंगाराचे साहित्य आदी ठिकाणी वाढती डासोत्पत्ती रोखणे गरजेचे असल्याची मागणी नागरिक करत आहेत.

### स्वत:च्या चुकांकडे महापालिकेचा कानाडोळा...



» पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून दररोज कंटेनर सर्व्हे केला जात आहे. डेंग्यू, चिकनगुनिया आदीसारख्या आजारांना थांबविण्यासाठी डासोत्पत्तीची ठिकाणे नष्ट केली जातात. त्यानुसार घरातील फ्रीज, पाण्याची भांडे, टाकी, पंक्चरची दुकाने, बांधकामाच्या ठिकाणी तपासणी केली जात आहे. या ठिकाणी डासांच्या निर्मितीला कारण ठरल्यास संबंधीत मालकावर पाच हजार रुपयांच्या कारवाईचा दंडुका उगारण्याची तत्परता आरोग्य विभागाचे कर्मचारी दाखवित आहेत. मात्र स्वतःच्या चुकांकडे कानाडोळा करत असल्याची वस्तूस्थिती आहे.

# चिखलीत २० गुंठ्यात होणार तहसील कार्यालय

## जिल्हाधिकाऱ्यांना प्रस्ताव सादर


### तलाठी कार्यालयासह सुसज्ज कार्यालय उभारणार

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिखली येथे २० गुंठे जागेत पिंपरी-चिंचवड तहसील कार्यालय होणार आहे. त्या बाबतचा प्रस्ताव पुणे जिल्हाधिकाऱ्यांकडे तहसील कार्यालयाकडून पाठवला आहे. त्यावर सकारात्मक तोडगा काढून शास्तनस्तरावर पाठपुरावा केला जाणार आहे. या प्रस्तावाला गती मिळाल्यास तलाठी कार्यालयासह सुसज्ज तहसील कार्यालयाची निर्मिती होणार आहे.**

सध्या निगडी येथील फ क्षेत्रीय कार्यालयाच्या शेजारी अप्पर तहसील कार्यालयाचे कामकाज सुरू आहे. या ठिकाणची जागा अपुरी पडत आहेत. उत्पन्नाचा दाखला, रहिवाशी दाखला आदीसह विविध दाखले काढण्यासाठी येणाऱ्या नागरिकांची मोठी संख्या आहे. महाविद्यालयीन प्रवेशावेळी रहिवाशी आणि उत्पन्नाच्या दाखल्यांसाठीची दिवसाकाठी ७०० नोंद होत आहे.

शहराचा व्याप वाढला आहे. या कार्यालयात अपुरी कर्मचारी संख्या आहे. त्या प्रमाणात दाखल्यांचे वाटप होत नाही. सध्या आठ क्लर्क असून त्या पैकी दोघांना इतर कार्यालयाचा भार दिला आहे. त्यामुळे सहा क्लर्क, एक अव्वल कारकून, नायब तहसीलदार आणि अप्पर तहसीलदार एवढ्यांवरच कार्यालयाच्या कामकाजाचा भार येत आहे.




### जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सकारात्मक कार्यवाही...

**» कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना बसण्यासाठीची सुसज्ज व्यवस्था नाही. आलेले साहित्य ठेवण्याची व्यवस्था नाही. त्यामुळे सुसज्ज कार्यालयासाठी पाऊले उचलण्यात आली आहेत. या पुर्वी अनेक वेळा इतर ठिकाणी कार्यालय व्हावे, यासाठी पत्रव्यवहार झाले आहेत. मात्र त्याला गती मिळाली नाही. सध्या चिखली येथील जलशुद्धीकरण केंद्राच्या जवळील २० गुंठे जागेची मागणी करण्यात आली आहे. पुणे जिल्हाधिकाऱ्यांना त्या बाबतचा प्रस्ताव पाठविला आहे. त्यानुसार एकदा बैठक घेऊन शासनस्तरावर कार्यवाही काढण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी देखील सकारात्मकता दर्शवली आहे.**

# महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र चिंचवडमध्ये!

। चिंचवड।महाईन्यूज ।

राज्याच्या औद्योगिक क्रांती व आर्थिक विकासात पिंपरी- चिंचवडचे मोलाचे स्थान पाहता शहरात (Chinchwad) महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राची स्थापना करण्यात आली असून नवउद्योजकांना उद्योग व्यवसायातील विविध संधी, नोंदण्या, परवाने, शासकीय कर्ज योजना आदींची माहिती केंद्रामार्फत देण्यात येणार आहे. नव्याने उद्योग- व्यवसाय करु इच्छिणाऱ्या नागरिकांना या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी) ही उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था असून राज्यात उद्योजकतेचा विकास, प्रचार व प्रसार व्हावा या उद्देश्याने सन 1988 मध्ये संस्थेची स्थापना करण्यात आलेली आहे. प्रत्येक जिल्हा उद्योग केंद्राच्या आवारात संस्थेला कार्यालय, प्रशिक्षण घेण्याकरिता मुलभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. सामान्य नागरीकांना उद्योजकीय प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ मिळावा याकरिता संस्थेमार्फत विविध प्रकारचे निशुल्क तसेच सशुल्क प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात.

मागील गेली 35 वर्षांपासून जवळपास 16 लाखांहून अधिक लाभार्थ्यांनी संस्थेमार्फत लाभ घेतलेला आहे. प्रशिक्षण तसेच (Chinchwad) प्रशिक्षणोत्तर नव्याने उद्योग सुरु करु इच्छिणाऱ्यांसाठी एमसीईडी मदतीचा हात देते आणि प्रत्यक्ष उद्योग-व्यवसाय सुरु होण्याकरिता आवश्यक मार्गदर्शन करते. नवउद्योजकांना शासकीय कर्ज योजना, अनुदान योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम केंद्रामार्फत राबविण्यात येतो.

अधिक माहितीसाठी पिंपरी-चिंचवड भागातील इच्छुक नागरिकांनी गेट क्र. 2, ऑटो- क्लस्टर आवार, सी-181, एच ब्लॉक, चिंचवड येथील महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राच्या कार्यालयात संपर्क साधावा, असेही आवाहन महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रामार्फत करण्यात आले आहे.




# सव्वा वर्षातील उद्योगभरारी!

**राजकारण म्हणजे एकमेकांवर टीकाटिप्पणी करणे इतकेच असते, असा समज सध्या काहींचा झालेला दिसतो. आजच्या सोशल मीडियाच्या युगात अशा टीकेला उत्तर देणेसुद्धा अपरिहार्य होऊन बसते. महायुतीच्या सरकारलाही ते करावे लागत आहे.**

मात्र तरीही टीकेला अधिकाधिक वेळा कामातून उत्तर देणे, हीच आपली नीती असावी अशी आमची कामाची धारणा आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्याचा कारभारी टीकेला कामातून उत्तर देत सक्षमरीत्या चालवला जात आहे. करोनाच्या काळात मंदावलेल्या अर्थचक्रास गती देऊन ते स्थिरस्थावर करणे ही आमची सर्वात मोठी जबाबदारी होती. त्यासाठी उद्योग विभागामार्फत अनेक रोजगाराभिमुख योजना राबविल्या गेल्या.



उद्योग विभाग व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) समन्वयाने विविध उपक्रम हाती घेण्यात आले. त्यातून राज्याकडे आकर्षित झालेली मोठी गुंतवणूक, निर्माण झालेल्या रोजगाराच्या संधी हे सरकारचे गेल्या सव्वा वर्षातले मोठे यश आहे. जागतिक स्तरावर महाराष्ट्र हे उद्योग क्षेत्रातील गुंतवणुकीचे सर्वाधिक पसंतीचे राज्य म्हणून पुढे आले आहे. तसेच अत्याधुनिक पायाभूत सुविधा, धोरणात्मक भागीदारीला प्रोत्साहन यातून देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध कार्यक्रमांमध्येही महामंडळाने सक्रिय सहभाग नोंदविला आहे. केंद्र सरकारच्या उद्योग संवर्धन आणि अंतर्गत व्यापार विभागाने प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, महाराष्ट्राने एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ या आर्थिक वर्षात १,१८,४२२ कोटी रुपयांची थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) आकर्षित केली आहे. ती देशाच्या एकूण एफडीआयच्या ३२ टक्के आहे. महाआघाडीच्या काळात पिछाडीवर गेलेला महाराष्ट्र पुन्हा पहिल्या क्रमांकावर आला आहे. जून २०२२ ते जुलै २०२३ या कालावधीत ३१ सामंजस्य करारांवर (एमओयू) राज्याने स्वाक्षरी केली, त्यातून राज्यात १,४८,९३० कोटी रुपयांची गुंतवणूक होत असून १,४७,९६९ रोजगार उपलब्ध होणार आहेत. दावोसमध्येही महाराष्ट्र सरकारने १९ सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. केंद्र सरकारने देशभरात एकूण सात ठिकाणी 'पीएम मित्रा पार्क'ना मंजुरी दिली, त्यापैकी एक पार्क अमरावतीजवळ नांदगाव पेठ येथे मंजूर करण्यात आले. यासाठी एमआयडीसीने केवळ दोन महिन्यांत १००० एकर जमीन अधिग्रहण करण्याची अभूतपूर्व कामगिरी केली. यासंबंधी राज्य सरकार व भारत सरकार यांच्यात १,३७० कोटींच्या पाच सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. त्यातून प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पाच हजार युवकांना रोजगार मिळणार आहे. यातून वस्त्रोद्योगात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक अपेक्षित असून निर्यात क्षमतेतही वाढ होणार आहे. विदर्भ इंडस्ट्रियल असोसिएशनसह याबाबत सामंजस्य करार झाला आहे. इतर जे महत्त्वाचे सामंजस्य करार झाले, त्यात एमआयडीसीतर्फे मॉरिशसच्या आर्थिक विकास मंडळासह 'सिंगल प्लॅटफॉर्म'ची स्थापना करण्यात येणार आहे. मार्च महिन्यात एमआयडीसी आणि स्वीडन इंडिया व्यापार संघ यांच्यातही सामंजस्य करार झाला. यानुसार शाश्वत पायाभूत सुविधा, कचऱ्यापासून वीजनिर्मिती व परिवहन आणि सुरक्षा क्षेत्रातील उत्पादनवाढ यावर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. याचबरोबर तैवान स्थित, गोगोरो या कंपनीला इलेक्ट्रिक वाहनांच्या निर्मितीसाठी १२,००० कोटी रुपयांच्या प्रकल्पासाठी ऑफर लेटर देण्यात आले आहे. भारतीय पादत्राणे व चर्मोद्योग विकास कार्यक्रमांतर्गत (आयएलएफडीपी) रातवड (जि. रायगड) येथे मेगा लेदर फूटवेअर आणि ॲक्सेसरिज क्लस्टर डेव्हलपमेंट प्रकल्प उभारण्यासाठी केंद्र सरकारने जून महिन्यात मंजुरी दिली. यात भारत सरकारमार्फत १२५ कोटी रुपयांचे अर्थसाहाय्य दिले जाणार आहे. राष्ट्रीय राजमार्ग रसद प्रबंधन लिमिटेड (एनएचएलएम) यांच्या साहाय्याने १७ मल्टि-मोडल लॉजिस्टिक्स पार्क्सचा विकास करण्यात येत आहे, त्यापैकी पुण्यानजीक पवळेवाडी येथे अंदाजे ३३७ एकर जमीन एमआयडीसीमार्फत संपादनाच्या प्रक्रियेत आहे.

## संपादकीय »

### संघर्ष अन् भारत

***सुरक्षा परिषदेच्या अनेक अयशस्वी प्रयत्नांनंतर, संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने अखेरीस इस्रायल-हमास संघर्ष थांबविण्याचे आवाहन करणारा ठराव मंजूर केला.***

या ठरावाच्या बाजूने 120, तर विरोधात 14 मते पडली. अनुपस्थित राहिलेल्या देशांची संख्या 45 होती. भारत वगळता सर्व दक्षिण आशियाई देशांनी गाझा युद्धबंदी ठरावाच्या बाजूने मतदान केले. एवढेच नाही, तर 11 सदस्यीय ब्रिक्स प्लस गटात भारत हा एकमेव देश होता, ज्याने या ठरावासंदर्भात झालेल्या मतदानात भाग घेतला नाही. अर्थात, हा प्रस्ताव बंधनकारक नाही. भारताच्या परराष्ट्र धोरणाचा इतिहास पाहिल्यास, बहुतेक देशांशी युद्ध थांबवण्यासाठी आपण अशा प्रत्येक ठरावावर मतदान केले आहे. भारत दहशतवादाच्या मुद्द्यावर मध्यममार्ग निवडत असल्याचा दावा करत असला, तरी पॅलेस्टाईनबाबतच्या दीर्घकालीन धोरणाला ते आव्हान देणारे ठरत आहे. या अनुपस्थितीबाबत केंद्र सरकारकडून अधिकृत स्पष्टीकरण असे होते की, ठरावाच्या मजकुरात हमासचा विशेष उल्लेख असावा, अशी भारताची इच्छा होती.

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना व राष्ट्रवादीतील आमदारांच्या अपात्रतेच्या संदर्भातील याचिकांवर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना निर्णय घेण्याकरिता सर्वोच्च न्यायालयाने कालमर्यादा निश्चित केली, हे योग्यच झाले. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शिवसेनेतील फुटीर आमदारांच्या अपात्रतेवर ३१ डिसेंबर तर राष्ट्रवादीच्या आमदारांच्या अपात्रतेवर ३१ जानेवारीपर्यंत निर्णय अध्यक्षांना द्यावा लागणार आहे.**

# सर्वोच्च न्यायालयाने कालमर्यादा केली निश्चित

सर्वोच्च न्यायालयाने गेल्या मे महिन्यात आमदारांच्या अपात्रतेच्या याचिकांवर विधानसभा अध्यक्षांनी निर्णय घेण्याचा आदेश दिला होता. लोकसभा किंवा विधानसभा अध्यक्षांनी निष्पक्षपातीपणे निर्णय घेणे अपेक्षित असते. पण पीठासीन अधिकारी हे बहुतेकदा सत्ताधारी पक्षाचे सदस्य असल्याने नेहमीच सत्ताधारी पक्षाला किंवा गटाला अनुकूल भूमिका घेतात हे वर्षानुवर्षे अनुभवास येते.

शिवसेनेतील फुटीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे भवितव्य पणाला लागले आहे. यामुळेच अपात्रतेच्या याचिकांवर विधानसभा अध्यक्ष निर्णय घेण्यास वेळकाढू धोरण अवलंबत असल्याचा आरोप ठाकरे गटाकडून केला जातो. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी नेमके अध्यक्षांच्या वेळकाढूपणावरच बोट ठेवत ठरावीक कालमर्यादित निर्णय घ्यावाच लागेल, असे बजावले आहे. सर्वोच्च न्यायालयाने मे महिन्यात आदेश देऊनही तीन महिने



आमदारांच्या अपात्रतेवर काहीच कारवाई झाली नव्हती. या विरोधात ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली असता न्यायालयाने नार्वेकर यांना नोटीस बजावली होती. सप्टेंबरपर्यंत याचिका निकालात काढण्याकरिता अध्यक्षांनी काहीच कारवाई केली नाही. वर फेब्रुवारी अखेरपर्यंत अध्यक्षांनी मुदत मागितली. पण सर्वोच्च न्यायालयाने हे वेळापत्रक अमान्य करीत कालमर्यादा निश्चित केली.

विधानसभा अध्यक्ष हे अपात्रतेच्या याचिकांवर न्यायाधिकरण (ट्रिब्युनल) म्हणून भूमिका बजावत असल्याने त्यांच्यावर वेळेचे बंधन लादता येणार नाही, असा अध्यक्ष नार्वेकर यांचा युक्तिवाद होता. 'पुढील विधानसभा निवडणुकीची घोषणा होईपर्यंत अपात्रतेच्या याचिका प्रलंबित राहू नयेत आणि या याचिका ठरावीक वेळेत निकालात निघाल्याच पाहिजेत' असे सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले आहे. त्यावर अध्यक्षांवर कालमर्यादेचे बंधन घातल्यास तो चुकीचा पायंडा पडेल आणि विविध राज्यांमधील उच्च न्यायालये विधानसभा अध्यक्षांना ठरावीक काळात निर्णय घ्यावेत म्हणून आदेश देतील, अशी भीती नार्वेकर यांच्या वतीने युक्तिवाद करताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी व्यक्त केली, ती अनाठायी आहे. याचे कारण असे की अध्यक्ष किंवा सभापतींच्या आदेशाचे न्यायालयीन पुनर्विलोकन करता येते, हे सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीच स्पष्ट केले आहे. मणिपूरमध्ये आमदारांच्या अपात्रतेच्या अर्जावर विधानसभेच्या तत्कालीन अध्यक्षांनी वेळकाढूपणाचे धोरण अवलंबले होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# न्याय मिळेपर्यंत पाणी पिणार नाही!

## मराठ्यांवर गुन्हे दाखल करू नका : जरांगे-पाटील

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्रात २४ ते ३१ ऑक्टोबरदम्यान १४० गुन्हे दाखल झाले आहेत. याप्रकरणी १६७ जणांना अटक, तर १४६ जणांना नोटीस बजावण्यात आली आहे, अशी माहिती पोलीस महासंचालक रजनीश सेठ यांनी दिली. यावरून मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी सरकारला इशारा दिला आहे. शहाणे असाल, तर मराठ्यांवर गुन्हे दाखल करू नका. गुन्हे माघारी घ्यावेत.**

गुन्हे दाखल झाल्यानं सरकारविरूद्ध रोष निर्माण होत आहे, असं जरांगे-पाटलांनी सांगितलं. माजी मंत्री बच्चू कडू यांनी जरांगे-पाटील यांची अंतरवाली सराटी येथे भेट घेतली. यानंतर




जरांगे-पाटलांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. “बच्चू कडू मराठा आरक्षणासाठी दोन-तीन नेत्यांच्या विरोधात बोलले आहेत. सर्वात पहिल्यांदा मराठा कुणबी एक असल्याचं बच्चू कडूंनी सांगितलं. म्हणून बच्चू कडूंना मी व्यासपीठावर बोलावलं. बच्चू कडू राजकारणाच्या पलीकडे जाऊन मराठ्यांच्या बाजूनं उभे आहेत,” असं जरांगे-पाटील म्हणाले. “सरकार ६ कोटी मराठ्यांवर गुन्हे दाखल करणार आहे का? गुन्हे दाखल केल्यानं लोकांमध्ये सरकारविषयी जास्त रोष निर्माण होत आहे. अधिकाऱ्यांनी विनाकारण त्रास दिला, तर न्यायालयामार्फत त्यांच्यावर गुन्हे दाखल करा. गुन्ह्यांच्या भीतीमुळे आरक्षणाच्या लढ्यापासून मागे हटायचं नाही. हे खोटे गुन्हे आहेत,” असा आरोप जरांगे-पाटलांनी केला.“न्याय मिळेपर्यंत पाणी पिणार नाही. पुरावे असूनही सरकार मराठ्यांना जाणुनबुजून आरक्षण देत नाही. काही जातींना पुरावे नसताना आरक्षण दिलं. आपल्याला कठोर लढाई लढावी लागणार आहे. होणाऱ्या परिणामांना सरकार जबाबदार राहिल,” असा इशारा जरांगे-पाटलांनी दिला आहे. सर्वपक्षीय बैठकीनंतर सरकारने आपल्याकडे वेळ मागितला आहे. मी उपोणषाला बसून ७-८ दिवस झाले. सरकार आत्ता सांगत आहेत की त्यांना वेळ हवा आहे. कशासाठी आणि किती वेळ हवाय? हे सरकारने सांगावं. मग मी समाजाशी बोलून वेळ द्यायचा की नाही ते ठरवेन. पण वेळ दिला तर सरकार आरक्षण देणार आहे का? असा उलटसवाल मनोज जरांगे पाटील यांनी विचारला. त्याचवेळी

### आरक्षण कसं देणार हे आधी सांगा?

» सर्वपक्षीय नेत्यांच्या बैठकीनंतर मनोज जरांगे पाटील यांनी पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका स्पष्ट केली. आम्ही सरकारला चर्चेला चार दिवसांपासून बोलवत आहोत, पण ते येत नाहीत. यांना काड्या घालायची सवय लागली आहे. त्यामुळे मराठा समाजाला आता दम निघत नाही. मराठे तापट आहेत. तुम्हाला आरक्षणासाठी वेळ हवा असेल तर मला बोलता येतंय, तोवर चर्चेसाठी या. मी मराठा समाजाशी बोलून तुम्हाला वेळ द्यायचा की नाही, हे ठरवतो, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले.

आम्ही चर्चेला चार दिवसांपासून बोलवत आहोत, पण ते येत नाहीत. पण यांना काड्या घालायची सवय लागली आहे. त्यांना जे काही म्हणणं मांडायचंय, त्यांनी इथे येऊन मांडावं, असं जरांगे पाटील उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उद्देशून म्हणाले. मराठा आरक्षणाबाबत निर्णय घेण्यासाठी आज (१ नोव्हेंबर) सर्वपक्षीय बैठक घेण्यात आली होती. या बैठकीला सर्वपक्षीय नेत्यांनी, आमदारांनी उपस्थिती लावली. राज्य सरकार कायद्याच्या पातळीवर टिकेल, अशाच गोष्टी करेल. राजकारण कोणालाही करायचं नाही. आपण सगळे याबाबत सहकार्य करतच आहात. पण यापुढे आपल्यातील काही नेत्यांनी आंदोलन करण्यापेक्षा सरकारची बाजूही समजून घ्यावी, असं आवाहन उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्वपक्षीय नेत्यांना केलं. त्याचवेळी आंदोलकांनी आंदोलन करण्यापेक्षा सरकारची बाजू समजून घ्यावी, अशी विनंती देखील फडणवीस यांनी केली. नुसती कागदं देऊन आमच्या मराठा समाजाला फसविण्याचं काम करू नका. आम्हाला आरक्षण कसं देणार हे आधी सांगा. मागच्या वेळी पण मराठा आरक्षण देण्यावर सर्वपक्षीय बैठकीत एकमत झालं होतं, पण घोडं कुठं अडतंय, हे आम्हाला कळत नाही. किंबहुना बैठका होतायेत पण त्याच्यावर कार्यवाही होत नाही, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

# सरकारची प्रतिकात्मक अंत्ययात्रा!

## सिल्लोडमध्ये सरकारच्या विरोधात घोषणाबाजी

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या जनआंदोलनाला पाठिंबा म्हणून साखळी उपोषण, आमरण उपोषण तसेच धरणे, निदर्शने, नेत्यांना गावबंदी, लोकप्रतिनिधींच्या गाड्या अडवून रोष व्यक्त करणे अशी विविध आंदोलन मराठा समाजाच्या वतीने करण्यात येत आहेत. बुधवारी (दि. १) ग्रामीण भागातून तहसिल कार्यालयासमोर सरकारच्या विरोधात प्रचंड घोषणाबाजी सरकारच्या प्रतिकात्मक तिरडीची अंत्ययात्रा काढण्यात आली.**



आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर सुरू असलेल्या जनआंदोलन चळवळीत परिवर्तित झाले असून गावागावात विविध प्रकारचे आंदोलन मराठा समाजाच्या वतीने केले जात आहेत. बुधवारी (दि. १) सिल्लोड तालुक्यात सकल मराठा समाजाच्या वतीने सरकारच्या तिरडी अंत्ययात्रा आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. आंदोलकांनी सरकार विरोधात प्रचंड घोषणाबाजी करून तहसिल कार्यालयाचा परिसर दणाणून सोडला. सरकारच्या या प्रतिकात्मक तिरडी अंत्ययात्रेची सुरवात सकाळी ७ :३० वाजता तालुक्यातील पानवडोद येथून सुरुवात होऊन गोळेगाव, लिहाखेडी फाटा, पालोद, १२ नंबर फाटा, अन्वी फाटा, मंगरूळ फाटा, डोंगरगाव फाटा या मार्गाने मुख्य रस्त्याने सरकारची तिरडी अंत्ययात्रेने शहरात प्रवेश केला. सरकारच्या तिरडी अंत्ययात्रेत मार्गावरील गावातील नागरिक मोठ्यासंख्येने सहभागी झाले होते. शहरात अहिल्याबाई होळकर चौक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक या मार्गावरून सरकारची प्रतिकात्मक तिरडी रचलेली अंत्ययात्रा तहसील कार्यालय सिल्लोड येथे पोहचली. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी व सरकारच्या विरोधात काढण्यात आलेल्या सरकारच्या प्रतिकात्मक तिरडी अंत्ययात्रेत सहभागी झालेल्या सकल मराठा समाज बांधवांसह ईतर समाज बांधवांचे सिल्लोड तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

# साताऱ्यातील खंडाळा तालुका दुष्काळी जाहीर

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

यावर्षी कमी पावसामुळे साताऱ्यातील वाई आणि खंडाळा तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. राज्यात जाहीर करण्यात आलेल्या चाळीस तालुक्यात वाई व खंडाळा तालुक्यांचा समावेश आहे. यामुळे हजारो शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.

त्यानुसार दुष्काळी परिस्थितीत आवश्यक ती मदत करण्याबाबत तातडीने केंद्रांना विनंती करण्यात आली आहे. आमदार मकरंद पाटील यांनी याबाबत पाठपुरावा केला होता.साताऱ्यातील दोन्ही दुष्काळी तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांना केंद्र व राज्य सरकारकडून मदत निधी मिळणार आहे. दुष्काळात होरफळणाऱ्या शेतकऱ्यांना यामुळे दिलासा मिळणार आहे. २१ दिवसापेक्षा अधिक पावसाचा खंड, पिकातील कमी झालेली आद्रता, शेतीमालाच्या उत्पादनात पन्नास टक्के पेक्षा अधिक घट आणि भूगर्भातील खालवलेली पाणी पातळी, या निष्कर्षांच्या या विकासाच्या आधारे वाई व खंडाळा तालुक्यात दुष्काळी स्थिती आहे, असा निष्कर्ष काढण्यात आला आहे. तशी शिफारस कृषी विभागाकडून सरकारला करण्यात आली होती. त्यामध्ये सातारा जिल्ह्यातील वाई तसेच खंडाळा तालुक्याचा समावेश आहे. दुष्काळी परिस्थितीत आवश्यक ती मदत करण्याबाबत तातडीने केंद्राला विनंती करण्यात येणार आहे.

# निवडणूक रोख्यांमुळे लोकशाहीला धोका!

## » सर्वोच्च न्यायालयात याचिकाकर्त्यांचा दावा

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**विराजकीय पक्षांना निधी उपलब्ध करून देणाऱ्या निवडणूक रोख्यांच्या 'अपारदर्शी' योजनेमुळे भ्रष्टाचाराला वाव मिळतो. सत्ताधारी व विरोधकांना समान संधी मिळत नसल्याचे ही योजना लोकशाहीसाठी धोकादायक असल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात केला. हे प्रकरण गुंतागुंतीचे असल्याची टिप्पणी न्यायालयाने सुनावणीदरम्यान केली.**



असोसिएशन फॉर डेमोक्रेटिक रीफॉर्म्स (एडीआर) या स्वयंसेवी संघटनेसह इतरांनी केलेल्या निवडणूक रोख्यांना आव्हान देणाऱ्या याचिकांवर मंगळवारपासून सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील पाच सदस्यीय घटनापीठासमोर सुनावणी सुरू झाली. न्या. संजीव खन्ना, न्या. भूषण गवई, न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांचा घटनापीठात समावेश आहे. एडीआरची बाजू मांडताना ज्येष्ठ विधिज्ञ प्रशांत भूषण म्हणाले, की निवडणूक रोख्यांमुळे राजकीय पक्षांकडील निधीचा स्त्रोत जाणून घेण्याच्या अनुच्छेद १९ (१) (अ)द्वारे नागरिकांना मिळालेल्या अधिकारांचे हनन होत आहे. अपारदर्शी आणि निनावी देणग्यांमुळे देशातील भ्रष्टाचाराला चिथावणी मिळते आणि सत्तेत असलेल्या पक्षांना दिलेली रक्कम लाच असल्याचे मानण्यास जागा आहे.

भूषण यांनी आपल्या युक्तिवादामध्ये २०२१-२२ या आर्थिक वर्षात निवडणूक रोख्यांमधून मिळालेल्या देणग्यांची आकडेवारी सादर केली. या वर्षात भाजपला ५ हजार २७१ कोटी, काँग्रेसला ९५२ कोटी रुपये मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

राज्य पातळीवरील पक्षांचा विचार करता पश्चिम बंगालमधील सत्ताधारी तृणमूल काँग्रेसला ७६७ कोटी रुपये मिळाले असून राष्ट्रवादीला ६३ कोटी आणि आम आदमी पार्टीला ४८ कोटींच्या देणग्या २०२१-२२ या वर्षात मिळाल्या आहेत. अन्य एका याचिकाकर्त्यांची बाजू मांडताना ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिबल म्हणाले, की भांडवल आणि प्रभाव हे नेहमी हातात हात घालून चालतात. निवडणूक प्रक्रियेमध्ये प्रत्येकाला समान संधी मिळली पाहिजे. मुक्त निवडणूक ही आपल्या घटनेचा पाया आहे. याचिकाकर्त्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची भूमिका मांडताना ॲड. शदान फरासत यांनी सांगितले, की आपल्या पक्षाने निवडणूक रोखे न स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे. सुनावणीदरम्यान न्या. खन्ना यांनी टिप्पणी केली, की निवडणूक देणग्या हा महत्त्वाचा विषय आहे. हा मुद्दा सोपा नाही, गुंतागुंतीचा आहे. याप्रकरणी बुधवारीही घटनापीठासमोर सुनावणी होणार आहे. राजकीय पक्षांना रोख देणग्यांना पर्याय म्हणून केंद्र सरकारने २ जानेवारी २०१८ रोजी 'निवडणूक रोख्यां'ची योजना आणली. याअंतर्गत कोणीही भारतीय नागरिक किंवा भारतात स्थापन झालेली कंपनी निवडणूक रोखे खरेदी करून ते राजकीय पक्षाला देऊ शकते. लोकप्रतिनिधित्व कायद्याच्या अनुच्छेद '२९अ' अंतर्गत नोंदणी झालेल्या व गेल्या लोकसभा किंवा विधानसभा निवडणुकीत किमान १ टक्का मते मिळालेल्या पक्षांनाच हे रोखे स्वीकारता येतात.

राजकीय पक्षांना हे रोखे केवळ प्राधिकृत बँकांमधील खात्यांमधूनच वठवता येतात.

### समान संधी मिळली पाहिजे

» भूषण यांनी आपल्या युक्तिवादामध्ये २०२१-२२ या आर्थिक वर्षात निवडणूक रोख्यांमधून मिळालेल्या देणग्यांची आकडेवारी सादर केली. या वर्षात भाजपला ५ हजार २७१ कोटी, काँग्रेसला ९५२ कोटी रुपये मिळाल्याचे त्यांनी सांगितले. राज्य पातळीवरील पक्षांचा विचार करता पश्चिम बंगालमधील सत्ताधारी तृणमूल काँग्रेसला ७६७ कोटी रुपये मिळाले असून राष्ट्रवादीला ६३ कोटी आणि आम आदमी पार्टीला ४८ कोटींच्या देणग्या २०२१-२२ या वर्षात मिळाल्या आहेत. अन्य एका याचिकाकर्त्यांची बाजू मांडताना ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिबल म्हणाले, की भांडवल आणि प्रभाव हे नेहमी हातात हात घालून चालतात. निवडणूक प्रक्रियेमध्ये प्रत्येकाला समान संधी मिळली पाहिजे. मुक्त निवडणूक ही आपल्या घटनेचा पाया आहे.

> निवडणूक रोख्यांमुळे देशाच्या लोकशाहीला निश्चित धक्का बसतो, कारण सत्ताधारी आणि विरोधक किंवा राजकीय पक्ष आणि अपक्ष उमेदवार यांना यामध्ये समान संधी राहात नाही. देणग्यांमधील ५० टक्के रक्कम ही केंद्रातील सत्ताधारी पक्षांना, तर उर्वरित रक्कम ही राज्यांमधील सत्ताधारी पक्षांना मिळाली आहे. यामुळे आपली लोकशाही हा पैशांचा खेळ झाला आहे.
>
> **– ॲड. प्रशांत भूषण,** याचिकाकर्त्यांचे वकील

# तुष्टीकरणाचे राजकारण विकासातील मोठा अडथळा!

## » मोदी यांची विरोधकांवर टीका, एकजुटीने विकासाचे आवाहन

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**"देशाच्या विकासाच्या वाटचालीत ठरावीक वर्गाचे लांगूलचालन आणि तुष्टीकरणाचे राजकारण हा सर्वात मोठा अडथळा आहे. एक खूप मोठ्या राजकीय वर्गाला सकारात्मक राजकारण अजिबात सुचतच नाही. ते आपल्या राजकीय स्वार्थासाठी देशाच्या एकात्मतेबाबतही तडजोड करू शकतात," अशी टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी केली.**



देशाचे पहिले गृहमंत्री आणि उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती 'राष्ट्रीय एकता दिन' म्हणून देशभर साजरी करण्यात आली. यानिमित्त गुजरातमधील नर्मदा जिल्ह्यातील केवडिया येथील सरदार सरोवरलगतच्या सरदार पटेलांच्या एकात्मता स्मारकाला (स्टॅच्यू ऑफ युनिटी) पुष्पांजली अर्पण केल्यानंतर झालेल्या कार्यक्रमात मोदी बोलत होते. मोदी म्हणाले, की आपल्याला भारताला एक समृद्ध आणि विकसित देश बनवायचा आहे आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्याकडून प्रेरणा घेऊन हे ध्येय साध्य करायचे आहे. आपल्या या विकासयात्रेत तुष्टीकरणाचे राजकारण हा सर्वात मोठा अडथळा आहे. देशातील गेली अनेक दशके माजलेला दहशवाद, त्याची भयावहता, क्रौर्य हे लांगूलचालन करणाऱ्या माणुसकीच्या शत्रूंना अजिबात दिसत नाही. देशाच्या शत्रूंसोबत बिनदिक्कतपणे हातमिळवणी करताना त्यांना अजिबात संकोच वाटत नाही. जेव्हा देशाला याबद्दल जाणीव जागृती होईल तेव्हाच आपण आपली विकासाची उद्दिष्टे साध्य करू, असे सांगून मोदी म्हणाले, की देशाची एकात्मता टिकवण्याचा प्रयत्न क्षणभरही सोडता कामा नये. एकतेचा मंत्र आपल्याला सातत्याने आचरणात आणायचा आहे. गेल्या नऊ वर्षांत देशांतर्गत सुरक्षेलाही अनेक आव्हाने निर्माण झाली. मात्र, सुरक्षा दलांनी अत्यंत सक्षमपणे आणि कठोरपणे त्यांचा बीमोड केला असे ते म्हणाले. देशवासीयांना नऊ वर्षांपूर्वी गर्दीच्या, वर्दळीच्या बाजारपेठेत, सार्वजनिक ठिकाणी आणि व्यावसायिक केंद्रात वावरताना धाकधूक वाटत असे असा दावा त्यांनी केला. मोदींनी यावेळी जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे अनुच्छेद ३७० रद्द केल्याचा उल्लेख केला. जम्मू-काश्मीरमध्ये लागू असलेले अनुच्छेद ३७० हटवले जाऊन काश्मीरला स्वातंत्र्य मिळेल, असे कोणाला वाटले होते का? पण आज काश्मीर आणि देशामध्ये अनुच्छेद ३७० चा अडथळा दूर झाला आहे. सरदारसाहेब याबाबत खूप समाधानी असतील आणि आशीर्वाद देत असतील असा दावा त्यांनी केला.

### जुलै 2022 मध्ये मद्य धोरणात घोटाळा

» 8 जुलै 2022 रोजी दिल्लीचे मुख्य सचिव नरेश कुमार यांनी नवीन दारू धोरणात घोटाळा झाल्याचा आरोप केला होता. त्यांनी एलजी व्हीके सक्सेना यांना याबाबतचा अहवाल सादर केला. सिसोदिया यांनी परवानाधारक दारू व्यावसायिकांना अवाजवी फायदा दिल्याचे सांगण्यात आले. दुसरीकडे, एलजींनी असेही म्हटले की, मद्य धोरणात त्यांच्या आणि कॅबिनेटच्या मंजुरीशिवाय बदल करण्यात आले आहेत.

# मिलिंद शिंदे साकारणार गुरुआईची भूमिका



अनेक यशस्वी भागांनंतरही 'गाथा नवनाथांची' (GATHA NAVNATHANCHI) ही मालिका आजही प्रेक्षकांच्या मनावर राज्य करत आहे. बाल नागनाथांच्या भूमिकेत आरूष बेडेकरचा कमाल अभिनय प्रेक्षक अनुभवत आहेतच. त्यातच आता बाल नागनाथांना काटशह देण्यासाठी गुरुआईचा प्रवेश गावात झालेला पाहायला मिळतोय. विशेष म्हणजे गुरुआई या भूमिकेसाठी सुप्रसिद्ध अभिनेते मिलिंद शिंदे (MILIND SHINDE) यांची निवड करण्यात आलेली आहे. 'गाथा नवनाथांची' या मालिकेत मिलिंद शिंदे गुरुआईची भूमिका साकारणार आहे. 'गाथा नवनाथांची' मालिकेत आजवर सादर झालेल्या व्यक्तिरेखा आणि त्या साकारणारे कलाकार यांची उत्तम निवड 'गाथा नवनाथांची' या मालिकेच्या यशाचं गमक आहे. 'गाथा नवनाथांची' मालिकेत सध्या घमासान युद्ध परिस्थिती रंगली आहे. हे युद्ध बाल नागनाथ आणि गुरुआई यांमध्ये घडताना दिसतंय. बाल नागनाथांनी गावाचे रक्षण तसेच उद्धार करण्याचा विडा उचललेला आहे. पण बाल नागनाथांचे समाजकार्य आणि गावकऱ्यांच्या मनामधील त्यांच्याविषयीची वाढत जाणारी आस्था, आपुलकी गावातील पाटलांच्या नजरेत खुपते आहे. बाल नागनाथांचा बंदोबस्त करण्यासाठी पाटील गुरुआईला बोलावणं धाडतात, पण बाल नागनाथ गुरुआईचा प्रत्येक वार निकामी करताना दिसताहेत. पाटलांच्या सांगण्यावरून षडयंत्र रचणारे गुरुआई हे पात्र मिलिंद शिंदे या सुप्रसिद्ध अभिनेत्याने रंगवले असून आपल्या अनेकविध भूमिकांनी लोकपसंतीस उतरणारे मिलिंद शिंदे सोनी मराठीवरील 'गाथा नवनाथांची' या मालिकेतील 'गुरुआई' या भूमिकेद्वारा प्रेक्षकांच्या पसंतीस पुन्हा एकदा पात्र ठरतील यात काहीच शंका नाही.

# हृतिकनं दिल्या सबाला वाढदिवसाच्या शुभेच्छा!

अभिनेता हृतिक रोशनची (HRITHIK ROSHAN) (HRITHIK ROSHAN) गर्लफ्रेंड सबा आझादचा (SABA AZAD) आज वाढदिवस आहे. तिच्या वाढदिवसानिमित्त अनेक सेलिब्रिटी हे सोशल मीडियावर विविध पोस्ट शेअर करत आहेत. नुकतीच हृतिकनं एक खास पोस्ट शेअर करुन सबाला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. त्याच्या या पोस्टनं अनेकांचे लक्ष वेधले आहे. हृतिकनं सबासोबतचा फोटो सोशल मीडियावर शेअर करुन कॅप्शनमध्ये लिहिलं, "आपण सर्वजण अशी जागा शोधत असतो, जिथे तुम्हाला प्रेरणा मिळाल्यासारखे आणि सुरक्षितता वाटेल. चला जीवन उत्साहानं जगूया, साहस करुया! असं आपल्यासोबत ओरडणारं कोणतरी आपल्या आयुष्यात पाहिजे. तिथूनच साहस सुरू होते. साहजिक त्यामुळे जादू निर्माण होते.हे मी तुझ्याकडून शिकतो सबा. चला साहस करूया.वाढदिवसाच्या शुभेच्छा माय लव्ह." हृतिकच्या या पोस्टवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे. हृतिक आणि सुझान यांचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत असतात. काही दिवसांपूर्वी हृतिकचा फॅमिली फोटो देखील सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. या फोटोमध्ये सबा देखील दिसत होती. हृतिक रोशनच्या फॅमिलीसोबत संडे लंच करण्यासाठी सबा त्याच्या घरी गेली होती. हृतिक रोशननं सुझान खानसोबत 200 मध्ये लग्नगाठ बांधली त्यानंतर 2014 मध्ये हृतिक आणि सुझान हे विभक्त झाले. गेल्या काही दिवसांपासूनहृतिक हा सबाला डेट करत आहे तर सध्या सुझान ही अरसलान गोनीला डेट करत आहे, अशी चर्चा सोशल मीडियावर सुरु आहे. हृतिक रोशन हा लवकरच फायटर या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या चित्रपटात त्यांच्यासोबत दीपिका पदुकोण आणि अनिल कपूर मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. हा चित्रपट पुढील वर्षी 26 जानेवारीला प्रदर्शित होणार आहे. फायटरमध्ये दीपिका आणि हृतिक दोघेही ॲक्शन मोडमध्ये दिसणार आहेत.



# सामान्य माणसाला त्रास देऊन काय होणार?

केतकी चितळे ही लोकप्रिय मराठी अभिनेत्री. तुझं माझं ब्रेकअप या मराठी मालिकेतुन केतकी चितळे प्रसिद्धीझोतात आली. केतकी चितळे सतत समाजमाध्यमांवर विविध राजकीय, सामाजिक विषयांवर पोस्ट करत असते. केतकीने काहीच तासांपुर्वी मराठा समाजाच्या आरक्षणावर पोस्ट केलीय. या पोस्टची सध्या जोरात चर्चा सुरु आहे. केतकी चितळेने सोशल मीडियावर एक पोस्ट केलीय. यात तिने मराठा समाजाच्या आंदोलकांनी फोडलेल्या एस.टी. बसचा फोटो पोस्ट केलाय. हा फोटो पोस्ट करुन केतकी लिहिते, एस टी बस फोडून आरक्षण कसे मिळते बुवा??! केतकी चितळेने पुढे लिहीलंय की, "सरकारकडे मागणी करा, सामान्य माणसाला त्रास देऊन काय होणार? आणि एस टी विभाग किंवा चालक कसे देणार आरक्षण. चुकुन तो दगड चालकाला लागला असता तर? ।।जय हिंद।। ।।वंदेमातरम्।। ।। भारत माता की जय।।" अशाप्रकारे केतकी चितळेने मराठा समाजाच्या आरक्षणाच्या आंदोलनावर पोस्ट केलीय. या पोस्टचं काहींनी समर्थन केलंय तर काहींनी केतकीच्या पोस्टवर टिका केलीय.

# 'छडी लागे छम छम' गाणं नव्या अंदाजात



श्यामची आई सिनेमा सध्या चांगलाच चर्चेत आहे. श्यामची आई सिनेमा अवघ्या काही दिवसांत प्रेक्षकांच्या भेटीला येतोय. श्यायची आई सिनेमातलं एक नवीन गाणं प्रेक्षकांच्या भेटीला आलंय. हे गाणं लहानांपासुन मोठ्यांपर्यंत सर्वांच्या परिचयाचं आहे. ते गाणं म्हणजे छडी लागे छम छम. छडी लागे छम छम गाणं नव्या अंदाजात प्रेक्षकांच्या भेटीला आलंय. सुजय डहाके दिग्दर्शित श्यामची आई सिनेमातलं छडी लागे छम छम गाणं प्रेक्षकांच्या भेटीला आलंय. या गाण्याचा आनंद घेऊन पुन्हा एकदा सर्व लोकं बालपणीच्या आठवणीत नक्कीच रमतील यात शंका नाही. अशोक पत्की यांनी नव्या अंदाजात हे गाणं संगीतबद्ध केलंय. हे गाणं ऐकुन पुन्हा एकदा जुना काळ जगल्यासारखा वाटतोय. आता हे गाणं सिनेमात ऐकण्यास वेगळीच मजा असेल यात शंका नाही.

# 'पवित्र रिश्ता'ने अंकिताला मिळाला ब्रेक

अभिनेत्री अंकिता लोखंडेने 'बिग बॉस'च्या घरात आपली स्ट्रगल स्टोरी आणि पहिल्या मानधनावर भाष्य केलं आहे. अंकिता लोखंडेने टीव्ही इंडस्ट्रीमध्ये 17 वर्षे पूर्ण केली आहेत. दरम्यान मुनव्वरसोबत बोलताना अंकिता म्हणाली,"एकेकाळी माझ्याकडे खरचं पैसे नव्हते. जेवणाचा प्रश्न सोडवायचा की ऑडिशनला जायचं हेच कळत नव्हतं. आई-वडिलांकडून सारखे पैसे मागणं मला पटत नव्हतं". 'पवित्र रिश्ता' या



मालिकेमुळे अंकिताला खऱ्या अर्थाने ब्रेक मिळाला आहे. याबद्दल बोलताना अंकिता म्हणाली,"पवित्र रिश्ता' या मालिकेसाठी मला प्रति दिन 2000 रुपये मिळत होते. ज्यावेळी पहिल्यांदा माझ्या अकाऊंटमध्ये 50 हजार रुपये क्रेडिट झाले त्यावेळी मला खरचं खूप आनंद झाला होता. त्याआधी कधीच मी एवढे पैसे पाहिले नव्हते. त्यावेळी माझे पालकच माझी ताकद होते". सुशांत सिंह राजपूतसोबत ब्रेकअप झाल्यानंतर मी पूर्णपणे तुटले होते. त्यावेळी लोक म्हणत असे की,आता अंकिताचं कसं होणार? कोण लग्न करणार हिच्यासोबत? पण या दिवसांमध्ये मला आई-वडिलांचा खूप पाठिंबा मिळाला.

# डी कॉक, ड्युसेनने धुतले!

## आफ्रिकेने न्यूझीलंडला 190 धावांनी केले पराभूत

नवी दिल्ली । ।वृत्तसंस्था

**क्विंटन डि-कॉक आणि वॅन डॅर ड्यूसेनची शतकी खेळी आणि केशव महाराजच्या फिरकीच्या जोरावर दक्षिण आफ्रिकेवर तब्बल १९० धावांनी विजय मिळवला. हा सामना पुण्याच्या महाराष्ट्र क्रिकेट असोशिएशनच्या स्टेडियमवर खेळवण्यात आला होता. नाणेफेक जिंकल्यानंतर न्यूझीलंडने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, द. आफ्रिकेला मोठी धावसंख्या उभारण्यापासून रोखण्यात न्यूझीलंडला अपयश आले.**






दक्षिण आफ्रिकेने डि-कॉक ११४ चेंडू ११६, वॅन डॅर ड्यूसेन ११८ चेंडूमध्ये १३३ आणि डेव्हिड मिलरच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर ३५७ धावा केल्या आणि न्यूझीलंडसमोर ३५८ धावांचे आव्हान ठेवले. द. आफ्रिकेच्या ३५८ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना न्यूझीलंडला १६७ धावाच करता आल्या. न्यूझीलंडकडून ग्लेन फिलीप्सने ६० चेंडूमध्ये ५० धावांची खेळी केली. फिलीप्सशिवाय कोणत्याही फलंदाजाला मोठी धावसंख्या उभारता आली नाही. आफ्रिकेकडून केशव महाराजने सर्वाधिक ४ विकेट्स पटकावल्या. शिवाय मार्को जेन्सन ३ तर कॉर्टजेने २ विकेट्स पटकावत आफ्रिकेचा विजयाचा मार्ग मोकळा केला. सामन्यात नाणेफेक हरल्यानंतर फलंदाजी करताना आफ्रिकेचा कर्णधार बवुमा 24 धावाकरून बाद झाला. यानंतर सलामीवीर क्विंटन डी कॉक आणि हेनरिक क्लासेन यांनी शतकी खेळी खेळली. ड्युसेनने 118 चेंडूत 133 धावा केल्या. डी कॉकने 116 चेंडूत 114 धावांची खेळी खेळली. ड्युसेनने आपल्या खेळीत नऊ चौकार आणि पाच षटकार मारले. तर डी कॉकने १० चौकार आणि तीन षटकार ठोकले. डेव्हिड मिलरने 30 चेंडूत 53 धावा केल्या. त्याने दोन चौकार आणि चार षटकार मारले. डी कॉक आणि व्हॅन दर दुसेनने दुसऱ्या विकेटसाठी 200 धावांची भागिदारी केली. हेन्रिक क्लासेन सात चेंडूत १५ धावा करून नाबाद राहिला आणि एडन मार्कराम एका चेंडूवर सहा धावा करून नाबाद राहिला. न्यूझीलंडकडून टीम साऊदीने दोन विकेट घेतल्या. ट्रेंट बोल्ट आणि जेम्स नीशम यांना प्रत्येकी एक यश मिळाले.

### क्विंटन डिकॉकने रचला इतिहास

दक्षिण आफ्रिकेचा सलामीवीर क्विंटन डिकॉकचा हा शेवटचा वर्ल्डकप आहे. दक्षिण आफ्रिका आज पुण्यात न्यूझीलंडविरूद्ध आपला सातवा सामना खेळत आहे. त्यात क्विंटन डिकॉकने शतकी खेळी करत संघाला दमदार सुरूवात करून दिली. क्विंटन डिकॉकचे हे शतक ऐतिहासिक ठरले. हे त्याचे यंदाच्या वर्ल्डकपमधील चौथे शतक आहे. तो आता एकाच वर्ल्डकपमध्ये सर्वाधिक शतके ठोकणाऱ्यांच्या यादीत दुसऱ्या स्थानावर पोहचला आहे. याचबरोबर तो दक्षिण आफ्रिकेकडून एका वर्ल्डकपमध्ये 500 पेक्षा जास्त धावा करणारा पहिला फलंदाज ठरला आहे.

वर्ल्डकप 2023 च्या पुण्यातील एमसीए स्टेडियमवर सुरू असलेल्या दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंडविरूद्धच्या सामन्यात प्रथम फलंदाजी करणाऱ्या आफ्रिकेने 50 षटकात 4 बाद 557 धावा केल्या. सलामीवीर क्विंटन डिकॉकने 114 तर रॅसी वेन डेर दुसेनने 118 चेंडूत 133 धावा केल्या. या दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी 200 धावांची भागीदारी रचली. त्याचबरोबर डेव्हिड मिलरनेही 30 चेंडूत 53 धावांची अर्धशतकी खेळी केली. दक्षिण आफ्रिकेने आपल्या या एकाच डावत अनेक वर्ल्डकप विक्रम मोडले. क्विंटन डिकॉकने न्यूझीलंडविरूद्धच्या सामन्यात 116 चेंडूत 114 धावांची झंजावाती शतकी खेळी केली. हे त्याचे यंदाच्या वर्ल्डकपमधील चौथे शतक ठरले. यापूर्वी त्याने श्रीलंकेविरूद्ध 84 चेंडूत 100, नेदरलँड्सविरूद्ध 106 चेंडूत 109 आणि बांगलादेश विरूद्ध 140 चेंडूत 174 धावांची शतकी खेळी केली होती.

# मॅक्सवेल इंग्लंडविरुद्ध खेळणार नाही!

## गेल्या वर्षीही मॅक्सवेलला झाली होती दुखापत

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतात सुरू असलेल्या एकदिवसीय विश्वचषक २०२३ दरम्यान दुखापतींची समस्या सातत्याने वाढत आहे. अनेक संघांचे स्टार खेळाडू दुखापतीमुळे बाहेर आहेत. हार्दिक पांड्याच्या दुखापतीमुळे भारतीय संघही चिंतेत आहे. दरम्यान, पाचवेळा चॅम्पियन ऑस्ट्रेलियाला इंग्लंडविरुद्धच्या सामन्यापूर्वी मोठा झटका बसला आहे. नेदरलँडविरुद्ध ४० चेंडूत शतक झळकावणारा आणि त्यानंतर चालू विश्वचषकात न्यूझीलंडविरुद्ध शानदार फलंदाजी करणारा स्टार खेळाडू ग्लेन मॅक्सवेल दुखापतग्रस्त झाला आहे.**

यामुळे तो इंग्लंडविरुद्धच्या पुढील महत्त्वाच्या सामन्यातून बाहेर राहणार आहे. ईएसपीएन क्रिकइंफोच्या वृत्तानुसार, ग्लेन मॅक्सवेल सोमवारी क्लब हाऊसमध्ये गोल्फ खेळताना जखमी झाला. या दुखापतीमुळे तो ६ ते ८ दिवस क्रिकेटपासून दूर राहणार आहे. संघाचे मुख्य प्रशिक्षक अँड्रयू मॅकडोनाल्ड यांनी सांगितले की, तो खेळाप्रती प्रामाणिक आहे आणि लवकरच परतेल. सुदैवाने दुखापत गंभीर नसल्याचे मुख्य प्रशिक्षक म्हणाले.



परिस्थिती आणखी बिघडली असती. यावेळी मुख्य प्रशिक्षकाने मॅक्सवेल केवळ एका सामन्यासाठी बाहेर बसेल, अशी अपेक्षा व्यक्त केली. ग्लेन मॅक्सवेलला वर्ल्ड कपपूर्वीच दुखापत झाली होती. गेल्या वर्षी मित्राच्या वाढदिवसाच्या पार्टीत घसरल्याने त्याचा पाय मोडला होता. या दुखापतीमुळे मॅक्सवेल जवळपास पाच महिने मैदानापासून दूर राहिला होता.

विश्वचषकापूर्वी भारताविरुद्धच्या वनडे मालिकेत मॅक्सवेलने पुनरागमन केले. मॅक्सवेलला झालेल्या दुखापतीनंतर त्याच्या जागी मार्नस लाबुशेनचा प्लेइंग इलेव्हनमध्ये समावेश केला जाऊ शकतो. नेदरलँड्सविरुद्धच्या सामन्यात मॅक्सवेलने ४० चेंडूत विक्रमी शतक झळकावले होते.

# शाहिद आफ्रिदी पीसीबी प्रमुखांवर संतापला!

नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

एकीकडे पाकिस्तान क्रिकेट संघ २०२३ च्या विश्वचषक स्पर्धेतील कठीण टप्प्यातून जात असताना, दुसरीकडे संघाच्या व्यवस्थापनालाही अडचणीचा सामना करावा लागत आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे प्रमुख झका अश्रफ यांनी अलीकडेच संघाचा कर्णधार बाबर आझमबद्दल बरेच काही बोलले आणि लाइव्ह शोमध्ये बाबर आझमचे व्हॉट्सअॅप चॅटही लीक केले होते.

या संदर्भात आता संघाचा माजी कर्णधार शाहिद आफ्रिदीने झका अश्रफवर जोरदार हल्ला चढवला. तसेच त्यांना आपल्या कामाशी काम ठेवण्याचा सल्ला दिला आहे. विश्वचषक २०२३ च्या शेवटच्या सामन्यात पाकिस्तानने बांगलादेशचा पराभव केला. यादरम्यान शाहिद आफ्रिदी एका पाकिस्तानी टीव्ही शोमध्ये बोलत होता. दरम्यान, त्याला झका अश्रफ आणि बाबर आझम यांच्यातील वादाबद्दल विचारण्यात आले तेव्हा आफ्रिदीने संतप्तपणे उत्तर दिले की, "झका अश्रफ हे कोणताही क्लब चालवत नसून ते पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे प्रमुख आहेत.

त्यांनी अनेक गोष्टींची काळजी घेतली पाहिजे. तुम्ही मीडिया हाऊसच्या मालकांना फोन करून सांगत आहात की कोणीतरी तुमच्याबद्दल काहीतरी बोलत आहे. तुम्ही तुमच्या कामाशी काम ठेवा, आपले काम करा. तुमच्याकडून जे अपेक्षित आहे ते पूर्ण करा. या विश्वचषकात पाकिस्तान संघाने चांगली सुरुवात केली होती, पण त्यांना आपल्या कामगिरीत सातत्य ठेवता आले नाही. सलग चार सामने गमावल्यानंतर पाकिस्तानने बांगलादेशविरुद्ध स्पर्धेतील तिसरा विजय संपादन केला.